“हिंगोली जिल्ह्यातील सेवाकेंद्राचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीकरिता सादर करावयाचा प्रबंध आराखडा

संशोधक

मारुती अरविंद विभूते

(एम.ए. बी.एड. भूगोल)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. विजय नागोजी विणकर

भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

ऑगस्ट 2023

“हिंगोली जिल्ह्यातील सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास”

➢ **प्रस्तावना :**

सेवा केंद्र हे विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा पुरवितात. एखाद्या विशिष्ठ प्रदेशात सेवा केंद्राचा विकास तेथील उपलब्ध विविध सेवा व त्याठिकाणी असलेली वाहतूक आणि दळणवळण साधने यांच्या विकासावर अवलंबून असते. कारण ही सेवा केंद्र तेथील सामाजिक भावना आणि इतर कार्यपद्धतीची वाढ करतात. म्हणून त्या प्रदेशातील सेवा केंद्र हे त्या प्रदेशाच्या विकासाचा मूळ आधार किंवा गाभा आहे. प्रदेशाचा विकास हा त्या ठिकाणच्या व्यवसायाशी निगडित असतो. विकास संकल्पना गुंतागुंतीची आणि गतिमान आहे. बाजार पद्धतीचा भौगोलिक अभ्यास म्हणजे त्या प्रदेशातील मागणी व पुरवठा याचे विश्लेषण होय.

भारतासारख्या विकसनशील देशात बाजार केंद्र हे शेतकऱ्यांच्या भेटीचे मुख्य ठिकाण आहे कारण अंतर्गत व्यापार जाळ्याचे मुख्य आकर्षण हे बाजार केंद्राचे ठिकाण आहे. तेथे विविध भागातून मालाचा ओघ संचलित केला जातो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत बाजार हे काही विशिष्ट निकषाद्वारे स्थानिक मालाची देवाण-घेवाण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. जेथे ग्रामीण बाजार प्रणाली हे मोठ्या प्रमाणात माल व सेवेचे संकलन करते तसेच वस्तू व सेवांच्या वितरणासाठी स्थानिक व बाहेरील हे दोन्ही केंद्र म्हणून सेवा देतात. सेवा केंद्राच्या सेवा तंत्राचे मोजमाप करण्याकरिता आणि विपणन भूगोलाच्या विश्लेषणात्मक अभ्यासाकरिता सेवा केंद्राचे सेवा क्षेत्र निश्चित करणे गरजेचे आहे. सेवा केंद्राचा विकास आणि उत्क्रांतीत सेवा केंद्राचे ठिकाण मुख्य कार्य आणि त्याचे मोजमाप करण्याच्या पद्धती याला अधिक महत्त्व दिले जाते. विपणन भूगोलाचे मुख्य कार्य आणि त्याचे मोजमाप करण्याच्या पद्धती याला अधिक महत्त्व दिले जाते. विपणन भूगोलाचे मुख्य कार्य हे विविध ठिकाणच्या सेवा केंद्रातील सेवांकडे ग्राहक कसे आकर्षित होतात हे आहे. अनेक भूगोल तज्ञांनी बाजार केंद्र आणि सेवा केंद्र यांचा सविस्तरपणे अभ्यास केलेला आहे.

➢ **अभ्यास क्षेत्र :**

हिंगोली जिल्हा हा परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन दिनांक 1 मे 1999 रोजी अस्तित्वात आला आहे.

हिंगोली जिल्हा 19° 05' उत्तर ते 20° 05' उत्तर या अक्षांशावर आणि 76°.30' पूर्व ते 77° 30' पूर्व या रेखांशाच्या दरम्यान पसरलेला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 4827 चौरस किलोमीटर असून ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या 1.6% इतके आहे. जिल्हा दख्खन पठारावरील महाराष्ट्र भागाच्या भागातील पूर्व महाराष्ट्राचा उपविभागाचा भाग आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची 500 मीटर आहे. 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 1177345 आहे. जिल्ह्यातील हवामान पावसाळा व्यतिरिक्त सर्वसाधारणपणे कोरडे असते. हिंगोली जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान 824 आहे. जिल्ह्याचा बहुतांश भाग हा गोदावरी नदीच्या खोऱ्यात येते. जिल्ह्यातून पेनगंगा, पूर्णा आणि कयाधू या तीन महत्त्वाच्या नद्या वाहतात. हिंगोली हे शहर कयाधू नदीच्या तीरावर वसलेले आहे. कयाधू ही पेनगंगेची मुख्य उपनदी असली तरीही जिल्ह्याची जीवन वाहिनी आहे. कयाधू नदीचे खोरे आर्थिक दृष्ट्या जास्त विकसित असून लोकवस्ती दाट आहे. संपूर्ण जिल्ह्याचा समावेश बेसॉल्टी खडकजन्य भूप्रदेशात होतो. या भागात ही काळी कापसाची किंवा रेगुर नावाने ओळखली जाते. हिंगोली जिल्हा कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात उडीद, मूग, सोयाबीन, तांदूळ, कापूस, ज्वारी इत्यादी महत्त्वाची पिके घेतली जातात. केळी व हळद ही महत्त्वाची व्यापारी पिके जिल्ह्यात पिकविली जातात. जिल्ह्यामध्ये कृषी आधारित उद्योगाची उभारणी होणे आवश्यक आहे. हिंगोली जिल्ह्यात एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 4.49% क्षेत्र वनाखाली आहे. जिल्ह्यात कुठेही घनदाट वनक्षेत्र आढळुन येत नाही. बारा ज्योतिर्लिंगापैकी आठवे ज्योतिर्लिंग हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथे आहे. दसरा महोत्सवाकरिता हिंगोली प्रसिध्द आहे. हा उत्सव जवळपास 160 वर्षापासून या शहरात होत असूनही परंपरा आजपर्यंत तितक्याच उत्साहाने साजरी होताना दिसत आहे.

व्यापारी भूगोल ही एक ज्ञान शाखा असून यामध्ये विविध सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय संघटन व स्थान यांचा अभ्यास केला जातो.

- **अभिक्षेत्रीय संघटन व अर्थ संकल्पना :**

इसवी सन 1960 सालापासून भूगोल या विषयांमध्ये अभिक्षेत्रीय संघटन विचारांना प्राधान्य मिळू लागले व भूगोलाच्या सर्वांगीण विकासास सुरुवात झाली. भूगोलाच्या विविध शाखांचा शास्त्रीय व भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जाऊ लागला. भूगोलात अलीकडच्या काळात विकसित झालेली अभिक्षेत्रीय संघटन संकल्पना ही एक महत्त्वाची

संकल्पना आहे. संयुक्त संस्थानातील राष्ट्रीय विज्ञान संस्थेच्या भूगोल समितीने अभिक्षेत्रीय संघटन या संकल्पनेत भूगोल विषय हा प्रमुख घटक मानला आहे.

- **अभिक्षेत्रीय संघटनेची व्याख्या :**

"भौगोलिक पर्यावरण मानव व त्याचे कार्य यांच्यातील अंतर क्रिया व त्यातून वेगवेगळ्या स्थानात निर्माण होणारे संघटित परस्परावलंबित्व स्पष्ट करणारी संरचना म्हणजे अभिक्षेत्रीय संघटन होय."

या विविध घटकाच्या हालचालीतून अभिक्षेत्रीय संघटनेची निर्मिती होत असते भौगोलिक क्षेत्रात मानव व पर्यावरण हे एकमेकांवर अवलंबून असतात.

- **अभिक्षेत्रीय संघटन स्वरूप:**

भूगोल विषयात नवीन विचारांना प्राधान्य मिळू लागली व भूगोलाच्या सर्वांगीण विकासाला सुरुवात झाली. इतर विविध भूगोल विषयाशी संबंधित घटकाचा अभ्यास होऊ लागला. उदा: अर्थशास्त्र समाजशास्त्र राज्यशास्त्र मानव वंश शास्त्र इत्यादी शास्त्रातील विविध संकल्पनांचा अभ्यास भौगोलिक दृष्टीने केला जाऊ लागला व भूगोलास बहुविद्या शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले.

- **अभिक्षेत्रीय संघटन प्रकार:**

हॅगेट या शास्त्राचे अधिक क्षेत्रीय संघटनेचे पुढील प्रकार सांगितले आहेत.

1) संलग्न स्थळ हे दोन मनुष्यातील युद्ध किंवा प्रेम करण्याचे ठिकाण असते.

2) वैयक्तिक स्थान हे दोन व्यक्ती मधील व्यक्तिगत संवादाचे ठिकाण असते.

3) सामाजिक स्थान हे स्थान सामाजिक व व्यावसायिक संवादासाठी वापरली जाते.

4) सार्वजनिक स्थान हे यात भाषण ऐकणे विक्री करणे यासारखी कार्य चालतात.

- **सेवा केंद्राचा अर्थ:**

बाजार म्हणजे वस्तूंची खरेदी विक्री करण्याचे ठिकाण होय. बाजार हा शब्द पार्शियन भाषेतून घेतला असून मूळ संस्कृत शब्द हट्ट यावरून हाट म्हणजे बाजार हाट हा शब्द मराठी भाषेमध्ये रूढ झाला आहे. बाजार यासाठी बाजार हाट हा शब्दही रूढ आहे. पण बाजार व

हाट यामध्ये फरक आहे. बाजार म्हणजे रोज किंवा आठवड्याने किंवा नियमित दिवशी ग्राहक विक्रेते व व्यावसायिक यांच्या सोयीचे ठिकाण होय, तर हट म्हणजे नियमित वेळीच भरणारा बाजार होय तसेच गंज म्हणजे बाजारपेठ होय.

वस्तूची खरेदी विक्री व त्या ठिकाणाहून पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवा यामुळे हे ठिकाण सेवा केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. या सेवा केंद्राचे शहरी सेवा केंद्र व ग्रामीण सेवा केंद्र असे दोन प्रकार पडतात. विपणन भूगोल ही आर्थिक भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. त्यात बाजार केंद्र सेवा केंद्र व बाजार पद्धती यातील विविध घटकाचा अभ्यास केला जातो. बाजार पद्धत ही भूगोलाच्या अभ्यासात महत्त्वाची असून त्यात या केंद्रातून पुरवठा केल्या जाणाऱ्या विविध वस्तू आणि सेवा यावर तेथील प्रादेशिक घटकांचा प्रभाव पडतो.

विपणन हे मानवाच्या आर्थिक क्रियाचा भाग आहे. मानव व आर्थिक गरजा यांच्यातील क्रिया प्रक्रियांचा आलेख म्हणजे बाजार होय. याचा अभ्यास विपणन भूगोलात केला जातो. विपणन हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मानव आपल्या गरजा भगविण्यासाठी अनेक आर्थिक क्रिया करतो. माल उत्पादित करतो. तो माल विकण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेतो विकत घेतो इत्यादी आर्थिक क्रिया मानव करतो. या सर्व क्रिया ज्या ठिकाणी घडतात त्या सेवा केंद्र म्हणून संबोधले जाते. या सर्व क्रियांचा अभ्यास विपणन भूगोलामध्ये केला जातो.

- **व्यापारी भूगोलाच्या व्याख्या :**

1) मॅक कार्ट व लिंडबर्ग (1966) च्या मते - "व्यापारी भूगोल हे व्यापारी क्रियांशी संबंधित असून त्यामध्ये किरकोळ, घाऊक व्यापार, विक्री सोयीसुविधा व व्यापारी संस्था यांचा अभ्यास केला जातो."

2) विल्य ॲपल बॉम (1954) "व्यापारी भूगोल हे मालाच्या उत्पादनापासून ते ग्राहकापर्यंत नेण्यासाठी व त्याच्या वितरणाच्या वेगवेगळ्या माध्यमाशी संबंधित आहे."

3) हॉडर (1964) "बाजारपेठेमध्ये चालणाऱ्या वेगवेगळ्या बाजार क्रिया त्यामध्ये मालाची देवाणघेवाण यांच्याशी व्यापारी भूगोल संबंधित आहे."

4) दिक्षीत (1988) च्या मते “बाजार संस्था हे एक भौगोलिक घटक असून यामध्ये माल व सेवा यांची देवाणघेवाण यांचा समावेश होतो.”

➢ **अभ्यासाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालील उद्दिष्टये समोर ठेवण्यात आली आहेत.

1) अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2) शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा, दळणवळण सुविधा, व्यापार सुविधा व 3500 लोकसंख्या या घटकांच्या आधारे सेवा केंद्र निश्चित करणे.
3) जिल्ह्यातील सेवा केंद्राच्या अभिक्षेत्रीय प्रारूपाचे विश्लेषण करणे.
4) जिल्ह्यातील सेवा केंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास करणे.
5) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राच्या प्रभावक्षेत्राचा अभ्यास करणे.
6) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्र विषयक सुविधांची उपलब्धता व कमतरता असलेले क्षेत्र दर्शविणे.
7) अभ्यास क्षेत्रातील नवीन सेवा केंद्र ठरविणे.

➢ **अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी मिळविण्यात आलेल्या प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या माहितीचे विश्लेषण विविध तक्ते नकाशे व आलेखाच्या साह्याने करण्यात आलेले आहे. त्यासाठी विविध सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. कारलं पीयर्स यांची सहसंबंध दाखविण्याची पद्धत प्रस्तुत संशोधनात सेवा केंद्र व क्षेत्र वस्त्या आणि लोकसंख्या यांचा सहसंबंध अभ्यासण्यात येणार आहे. याकरिता खालील सूत्राचा आधार घेण्यात येणार आहे.

$$r = \frac{\sum dx\, dy}{\sqrt{\left(\sum dx\right)^2 \times \left(\sum dy\right)^2}}$$

अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राचे वितरण कशाप्रकारे झालेले आहे हे पाहण्यासाठी “निअरेस्ट नेबर” पद्धतीचा वापर करण्यात येणार त्यासाठी खालील सूत्र वापरायचे आहे.

$$Rn = \frac{\text{Observed mean distance}}{\text{Expected mean distance}} \quad \text{OR} \quad 0.5\sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा –

Rn	=	Randomities
A	=	Total Area
N	=	Total Number of service centers (एकुण सेवा केंद्र)

सेवा केंद्र आणि क्षेत्र वसाहती व लोकसंख्या यानुसार असलेले वितरण अभ्यासण्याकरिता प्रमाण विचलन काढण्यात आलेले आहे. त्याकरिता खालील सूत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

$$SD = \sqrt{\frac{\sum (x - x)^2}{N}}$$

सेवा केंद्राची केंद्रीयता काढण्यासाठी location quotient method या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

$$C = \frac{t}{T} \times 100$$

खुलासा –

C	=	Score for any function 't'
t	=	One unit of function 't'
T	=	Total number functional units of 't' in the area

सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी तीन पद्धतीचा वापर संशोधनात करण्यात येणार आहे. व्हीएलएस प्रकाशराव यांची सुधारित पद्धत आणि जॅक्सन यांची सुधारित पद्धत आणि सक्सेना यांची सुधारित पद्धती यांचा वापर करण्यात आलेला आहे.

1) V.L.S. Prakash Rao Method –

$$D = \frac{T \times A}{U} / R = \frac{T \times A}{U}$$

Modified method

$$Sl = \frac{Tc \times A}{U} / R \quad = \sqrt{\frac{Tc \times A}{U}}$$

2) एच.एम. सक्सेना यांचे प्रभावक्षेत्राचे सुत्र –

$$\text{त्रिज्या} = \frac{\text{(एकुण क्षेत्र) x (सेवा केंद्राची एकुण लोकसंख्या)}}{\text{संपूर्ण अभ्यासक्षेत्राची एकुण लोकसंख्या}}$$

3) Jackson's Modified method :

1. $$\text{Influence area according to area} = \frac{\text{Total Area}}{\text{Total no. of service centre}}$$

2. $$\text{Influence area according to village} = \frac{\text{Total Village}}{\text{Total no. of service centre}}$$

3. $$\text{Influence area according to population} = \frac{\text{Total Population}}{\text{Total no. of service centre}}$$

सुधारीत सुत्र

$$\text{त्रिज्या} = \sqrt{\frac{\text{(एकुण क्षेत्र) x (सेवा केंद्राची एकुण लोकसंख्या)}}{\text{संपूर्ण अभ्यासक्षेत्राची एकुण लोकसंख्या}}}$$

याशिवाय विविध भूगोल अभ्यासकांच्या पद्धती वापरून सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

- **अभ्यास विषयाची व क्षेत्राची निवड :**

1) प्रस्तुत अभ्यासाकरिता अभ्यास क्षेत्र म्हणून हिंगोली जिल्हा निवडण्यात आला आहे. हा जिल्हा पाच तहसीलमध्ये विभागला आहे.

2) अभ्यास क्षेत्रात सेवा केंद्राच्या माध्यमातून पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवा सुविधा पुरेशा नाहीत. यात अभ्यास क्षेत्राचा तितकाचा विकास झालेला नाही.

3) जिल्ह्याच्या विकास नियोजनाकरिता हा जिल्हा निवडलेला आहे.

4) हिंगोली जिल्ह्यातील सेवा केंद्राचा अभ्यास आजपर्यंत एकाही भूगोल अभ्यासकाने केलेला नाही त्यामुळे या अभ्यास विषयाची व क्षेत्राची निवड केलेली आहे.

5) या प्रदेशाची आर्थिक स्थिती ही शेतीवर आधारित आहे. त्यामुळे या अभ्यास क्षेत्रातील बरीचशी लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेली आहे.

6) या प्रदेशात रस्ते वाहतुकीचा तितकासा विकास झालेला नाही. आणि सेवा केंद्राच्या वितरणावर वाहतूक व दळणवळण सुविधांचा मुख्य प्रभाव असतो.

या जिल्ह्यात उद्योगधंद्यांचा व औद्योगिक विकास फारसा झालेला नाही.

- **साहित्य पुनरावलोकन :**

प्रस्तुत संशोधनामध्ये मागील अभ्यासाचा आढावा या सदराखाली आतापर्यंत ज्या ज्या अभ्यासकांनी बाजार केंद्राविषयी सखोल संशोधन केले आहे त्या संशोधनाचा एक संक्षिप्त आढावा या ठिकाणी घेण्यात आला आहे. विविध संस्था संशोधन केंद्र व विद्यापीठांमध्ये शोध प्रबंधाचा अभ्यास अनेक संशोधकांनी व्यापारी भूगोलाच्या अभ्यास क्षेत्रात पूर्ण केलेला आहे. या संशोधनामध्ये पाटील (1993), फाटे (1989), जगदाळे (1990) यांचा समावेश होतो. वेगवेगळ्या प्रदेशातील बाजार केंद्राचा वेगवेगळ्या घटकांना अनुसरून संशोधनात्मक अभ्यास केलेला आहे. जसे बाजार केंद्र त्याचा उदय विकास स्थान वितरण वाहतूक केंद्रीयता बाजार पदानुक्रम ग्राहक व व्यापारी बाजारा चक्राचा आढावा इत्यादी बाबी अभ्यासलेल्या आहेत.

1) प्रा. सिंग यांनी ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास करत असताना प्रशासकीय सेवा, संदेशवहन सेवा, व्यापार सेवा इत्यादीचा आधार घेऊन सेवा केंद्राचा अभ्यास केलेला आहे.

2) गुहा बी (1996) यांनी हुगळी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्र यांचा अभ्यास केला आहे. त्यात त्यांनी प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र व डाक कार्यालयाचा अभ्यास केलेला आहे.

3) गोणे एस. एच. यांनी परभणी जिल्ह्याच्या विकास नियोजनात सेवा केंद्राचे योगदान याचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

4) भूपींदर झुत्शी (1987) यांनी त्यांच्या "सेवा केंद्र व त्याचा सभोवतालच्या प्रदेशावरील प्रभाव काश्मीर खोऱ्यातील क्षेत्र" अभ्यास या संशोधन पत्रिकेमध्ये सेवा क्षेत्राचे वर्गीकरण करून त्याचे प्रशासकीय नियोजनावर होणारे परिणाम याचा अभ्यास केलेला आहे.

5) गट एस. एल. (1976) यांनी त्यांच्या "हरियाणा राज्यातील कर्नाल जिल्ह्याचे सूक्ष्म नियोजन" या पुस्तकामध्ये सेवा केंद्राची केंद्रीयता तसेच स्तर रचना इत्यादी घटकांचा अभ्यास केलेला आहे.

6) हाश्मी आय. एम. यांनी लातूर जिल्ह्यातील सेवा केंद्राच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास या प्रबंधात सेवा केंद्राचा सविस्तरपणे अभ्यास केलेला आहे.

7) जाधव बी. एल. यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण डोंगराळ भागातील सेवा केंद्राचे संघटन याचा सविस्तरपणे अभ्यास केलेला आहे.

8) गायकवाड एस. आर. यांनी नांदेड जिल्ह्यातील सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास याचा सविस्तरपणे अभ्यास केलेला आहे.

9) घारपुरे व्ही. टी. आणि पवार सि. टी. यांनी पंचगंगा नदी खोऱ्यातील कृषी सेवा केंद्राची केंद्रीयता आणि श्रेणी तर याचा सविस्तरपणे अभ्यास केलेला आहे. त्याचबरोबर पंचगंगा खोऱ्यातील कृषी सेवा केंद्राच्या प्रभावक्षेत्राचे सीमांकन याचाही अभ्यास केलेला आहे.

- **प्रकरण मांडणी :**

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणांमध्ये व्यापारी भूगोलाचा अर्थ, व्याख्या, स्वरूप, व्याप्ती, सेवा केंद्राची आंतररचना, सेवा क्षेत्र, कालबद्धता, कृषी व्यापार सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय संघटन, अर्थ, प्रकार, सेवा केंद्रावर परिणाम करणारे घटक, उद्दिष्टे, आधारसामग्रीचे संकलन, अभ्यास पद्धती, अभ्यास विषयाची निवड, मर्यादा, साहित्याचे पुनरावलोकन, प्रकरण मांडणी इत्यादी घटकाचा समावेश होतो.

प्रकरण दुसरे : अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

या प्रकरणांमध्ये अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थान व विस्तार, भूपृष्ठरचना, नदी प्रणाली, मृदा, हवामान, वनस्पती, जलसिंचन, कृषी, भूमी उपयोजन, लोकसंख्या, बाजारपेठ, औद्योगिक, विकास, व्यापार आणि वाहतूक, दळणवळण इत्यादी घटकाचा समावेश केला जातो.

प्रकरण तिसरे : सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय वितरण

या प्रकरणांमध्ये सेवाकेंद्राची ओळख, त्याची मोजमाप पद्धती, सेवाकेंद्राचे निश्चितीकरण, सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय वितरण, त्यात तालुका निहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्ती व लोकसंख्या, सेवा केंद्राचे गुणोत्तर व त्याचा सहसंबंध, सेवा केंद्राच्या वितरणावर परिणाम करणारे घटक, सेवा केंद्राची टक्केवारी आणि घनता, सेवा केंद्राचे वितरणात्मक प्रारूप आणि शहरापासून विविध अंतरावर असलेल्या सेवा केंद्राचे जवळील, शेजारी विश्लेषण, तहसील निहाय सेवा केंद्राचे वितरण कसे आहे हे अभ्यासले गेले आहे सेवा केंद्रापासून ग्रामीण वस्तीचे अंतरानुसार तालुका निहाय वितरणाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

प्रकरण चौथे : सेवा केंद्राची केंद्रीयता आणि पदानुक्रम

या प्रकरणांमध्ये विविध सेवा केंद्राची केंद्रीयता, संकल्पना, सेवाकेंद्राची केंद्रीयता, केंद्रीयतेचे अभिक्षेत्रीय वितरण, सेवा केंद्राची श्रेणीस्तर व पदानुक्रम संकल्पना, श्रेणी स्तराचे प्रादेशिक वितरण याचा प्रामुख्याने अभ्यास केलेला आहे.

प्रकरण पाचवे : सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र

या प्रकरणांमध्ये सेवा केंद्राच्या प्रभावक्षेत्राचे सौधांतिक विश्लेषण त्यात सक्सेना व जॅक्सन, व्ही.एल.एस. प्रकाशराव यांनी वापरलेल्या अभ्यास पद्धतीच्या आधारे प्रभावक्षेत्र काढलेली आहे.

प्रकरण सहावे : सेवा केंद्राचे अधिक्षेत्रीय संघटन

या प्रकरणांमध्ये सेवा केंद्राचा विकास स्तर, सेवा केंद्राची प्रादेशिक असमानता, सेवा केंद्राचे वाहतूक व दळणवळण सुविधांचा आढावा व नियोजित सेवा केंद्र यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

प्रकरण सातवे: निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संशोधन करून काढलेले निष्कर्ष व त्या आधारे शासनास काही शिफारशी करण्यात येतील.

संदर्भ :

1) Bhat L. S. (1976) "Micro level planning : A case study of Karnal Haryana", K. B. Publication, New Delhi.
2) Guha B. (1986) "the rural service centre of Hoogly District" Geographical review of India.
3) Jayaswal S. N. (1965) “Sachendi – A study on a Rural service centre, Geographical review of India”
4) Misra K. K. (1987) “Service centre strategy in the Development planning of Harnipur district I. P. IJRS Calcutta.”
5) Sathe M. D. (1973) – “Regional planning an Areal Exercise”, Saraswat Prakashan, Poona
6) Brush J. E. and Bracey H. E. (1953) “Rural service centres in south eastern Wisconsin and south England the Geographycal Review.
7) Dhamushwar R. S. (2009) – A study of spatial or ganization of market centers in Latur district, unpublished Ph.D. Thesis S.R.T.M.U. Nanded
8) Misra R. P. (1989) “Research methodology” A Gandbook concept publications, New Delhi
9) Saxena H. M. (1990) “Marketing Geography”, Rawat publications, Jaipur
10) Tiwari R. C. (1980) – “Spatial organization of service centres in lower Ganga, Yamuna Doab – National Geographers”
11) हाशमी इरशाद मोहिमोदीन (2017) लातुर जिल्ह्यातील सेवा केंद्राच्या वितरणाचा भौगोलीक अभ्यास. अप्रकाशीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
12) गायकवाड एस. आर. (2022) “नांदेड जिल्ह्यातील सेवाकेंद्राचा भौगोलीक अभ्यास” अप्रकाशीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
13) District Census Handbook – Hingoli
14) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2018

सशोधक विद्यार्थी
मारुती अरविंद विभूते

संशोधन मार्गदर्शक